# सेवांकुर प्रेरणा शिबिर

(७ वे वार्षिक व राज्यस्तरीय १७ वे शिबिर)

आनंदवन, वरोरा, जि. चंद्रपूर

स्वत:च्या आयुष्यात काहीतरी वेगळे करु इच्छिणाऱ्या व
इतरांच्याही आयुष्यामध्ये काही वेगळेपण आणू इच्छिणाऱ्या तरुणांचे मुक्त व्यासपीठ.

दि. २२ फेब्रु. शुक्रवार, सकाळी १० ते
२४ फेब्रु.,रविवार, सायंकाळी ४ पर्यंत

**शिबिरामध्ये प्रवेश कोणाला** – ज्यांना स्वत:च्या आयुष्यात काहीतरी वेगळे करायचे आहे अशा वैद्यक, अभियांत्रिकी, कायदा, व्यवस्थापन, समाजकार्य, विधी, शिक्षण इत्यादि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या व इतरही शाखांच्या (कला, वाणिज्य, विज्ञान इ. सर्व) इच्छुक विद्यार्थ्यांना; शिक्षक, प्राध्यापक व कार्यकर्त्यांना. या प्रक्रियेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या १८ वर्षांपुढील कोणालाही.

**संयोजक**


डॉ. अविनाश सावजी

प्रयास–सेवांकुर, दंडे प्लॉटस्, राजापेठ, अमरावती, ४४४ ६०५

**Ph**. 0721-2573256, **Mob.** 94207 22107, 82753 29553

email :- sevankur@gmail.com, aksaoji@gmail.com;

Website : www.prayas-sevankur.org Blog : www.prayas-sevankur.blogspot.com


**: संपर्क :**

Amravati – Aditya 96656 98954

Akola – Amol Mankar -96651 83870, Ashwin - 94231 03087,

Ahmadnagar – Tejas Khairnar-78753 47020

Aurangabad – Sarika - 9975301951

Beed – Santosh Garaje- 97630 31020

Buldana- Amol Hade-90968 25562,

Chandrapur –Aniket Bhandarkar -9021409221

Dhule– Pranali – 97671 75225, Amit Bhamre-90963 46712

Gondia-Bhandara - Devendra Ganvir – 9420362643,

Jalgaon - Manoj Govindwar -82375 13242, Sagar Patil – 99603 75424

Jalna – Manoj Lonkar – 08698587001

Kolhapur/Sangli - Aniket Gadgil – 96239 85585

Konkan –Umesh Khade-98926 49664

Latur – Ranjeet – 84468 65908

Mumbai – Yashawant Thakur-98238 74715, Asif Sheikh- 9881604178

Nagpur - Prashant Kuchankar – 82754 00220, Rashmi Raut – 88570 59082,

Nanded –Shriram Biradar -94217 63905

Nasik – Mukesh Bhawsar- 92264 90212

Pune- Shadab 93254 42765, Sandip Barve -9860387827,

Satara – Dr. Avinash Pol- 02162-233481

Solapur – Digambar Nirmale-90962 54862

Washim – Priyanka Ghute – 8600546023

Wardha – Prabhakar Pusadkar-97632 23670

Yavatmal-Mahesh Pawar -94234 35255, Darane Sir-94205 47171

प्रिय मित्रांनो,

सस्नेह नमस्कार.

आयुष्यामध्ये काहीतरी वेगळे, काहीतरी चांगले करावे, स्वत:साठी जगतांनाच समाजासाठी सुध्दा काही करावे असे तुमच्यापैकी अनेकांना जे वाटते, ते केवळ स्वप्न न राहता प्रत्यक्षात येण्यासाठी एक दिशा, व्यासपीठ व परिवार सेवांकुर च्या रुपाने आपल्या सर्वांना मिळालेला आहे. सेवांकुर या खुल्या मंचामध्ये वय, लिंग, शिक्षण या प्रकारच्या कोणत्याही अडसराशिवाय आपणा सर्वांचे स्वागत आहे. काहीतरी वेगळे करण्याच्या समान सूत्राने व मैत्रीच्या नात्याने आपण सर्व सेवांकुरमध्ये एकत्र आलेलो आहोत.

आनंदवनात पू. बाबा आमटेंच्या आशिर्वादाने २००७ मध्ये पहिले सेवांकुरचे शिबिर झाले. त्यांनतर आतापर्यंत महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात एकूण १६ शिबिरे झालीत. या सर्व शिबिरांमधून काहीतरी करू इच्छिणारे महाराष्ट्रातील जवळपास ३५०० तरूण सेवांकुर परिवारात कायमचे सहभागी झालेत. त्यातील बरेच तरूण आपापल्या ठिकाणी कुठल्या ना कुठल्या सामाजिक सेवेच्या क्षेत्रात आपापले योगदान देत आहेत.

- ❑ सेवांकुर शिबिरामध्ये आपल्यासारखेच स्वप्न पाहिलेले व ते वास्तवात येण्यासाठी वाटचाल करीत असलेले काही ज्येष्ठ अनुभवी मित्र, त्यांचे जगणे, त्यांची जिद्द, निर्धार व अथक प्रयत्नांनी स्वप्ने साकार करण्याची धडपड आपणासोबत शेअर करतील. त्यांचे अनुभव ऐकण्यासाठी, त्यांच्या सहवासात काही क्षण घालविण्यासाठी, त्यांचे प्रयत्न, त्यांच्या प्रेरणा, त्यांच्या अडचणी, यश–अपयशाचे क्षण, त्यांची वाटचाल, त्यांना आलेले कडू–गोड अनुभव हे सर्व समजून घेण्यासाठी जरुर जरुर या ! शिवाय आपल्यासारखाच विचार करणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक युवा मित्र–मैत्रिणींची ओळख व साथ संगत सुध्दा आपल्याला सेवांकुरमध्ये मिळेल. यशस्वी करिअर करण्यासाठी स्वत:ला कसे तयार करावे यासंदर्भात डॉ. अविनाश सावजी यांचे विशेष सत्र होणार आहे.

- ❑ तुमच्यापैकी पण अनेकांनी आपापल्या पातळीवर यासारखीच काही स्वप्ने पाहिली असतील व त्या दिशेने काही प्रयत्न व कृति पण केलेल्या असतील; त्या अनुभवांचे सुध्दा शेअरिंग, सेवांकुर शिबिरामध्ये आपण करणार आहोत; त्यामुळे आपल्या इतर मित्रांना सुध्दा प्रेरणा मिळेल व ते आणखी जास्त कार्यप्रवण होतील.

- ❑ सूचना : पूर्ण वेळ उपस्थिती आवश्यक. (पूर्वसुचना देवून काही निवडक इच्छुक मित्रांना शिबिरामध्ये त्यांच्या सोयीनुसार कमी वेळासाठी पण सहभागी होता येवू शकेल.)

  - सेवांकुर शिबिराचे नोंदणी शुल्क विद्यार्थ्यांसाठी ४०० रु. तर इतरांसाठी ६०० रु. असेल. (भोजन–निवास व्यवस्थेसह) निवडक गरजूंना यामध्ये सवलत मिळू शकेल. नोंदणी शुल्काशिवाय, स्वेच्छापूर्वक आपल्या क्षमतेनुसार दान देवून हा उपक्रम स्वावलंबी होण्यासाठी आपली मदत मोलाची ठरेल. प्रवासखर्च स्वत:लाच करायचा आहे.
  - शिबिरासाठी आधी नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रवेशसंख्येची मर्यादा असल्याने लवकर नोंदणी करून आपला प्रवेश नक्की करा. त्यासाठी प्रयासच्या वेबसाईटवर **www.prayas-sevankur.org** दिलेला रजि. फॉर्म पूर्ण करा.
  - २२ फेब्रु.शुक्रवारला सकाळी १० वाजेपर्यंत सर्वांनी शिबिरस्थळी पोहचावे. त्यादिवशी सकाळपासून भोजन–निवासाची व्यवस्था केलेली आहे. रविवार दि. २४ फेब्रु.ला सायंकाळी ४ वाजता कार्यक्रम संपेल.
  - सोबत काय आणावे : स्वत:चे गरम पांघरुण, टॉर्च, नोटबुक, पुस्तक खरेदीसाठी पैसे !
  - नेहमीप्रमाणे वाचलीच पाहिजेत अशी खूप सारी पुस्तके, भरपूर सवलतीमध्ये उपलब्ध ! तरी पुस्तके खरेदीच्या तयारीने या.
  - इतरांसाठी प्रेरक ठरतील अशा तुम्ही केलेल्या उपक्रमाचे सादरीकरण प्रदर्शन दालनात पोष्टर्स, चार्टस, फोटो वा अन्य स्वरुपात करण्यासाठी तयारीने या.
  - आनंदवनातील कुष्ठरुग्ण व इतर अंध, मूक बधिर व विविध विकलांग रहिवासी विविध प्रकारच्या वस्तू तयार करतात. त्या खरेदी करुन आपण त्यांच्या कार्याला मदत करु या !

आनंदवनला कसे पोहचायचे : आनंदवन हे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा या तालुक्याच्या ठिकाणी आहे. वरोरा हे नागपूर–चंद्रपूर रस्त्यावर नागपूरहून ११० किमी. अंतरावर आहे. तर वर्धेपासून १०५ किमी व यवतमाळपासून १३० किमी. आहे.

नागपूर–वर्धेकडून येणाऱ्यांनी आनंदवनात पोहचण्यासाठी वरोरा बस स्थानकावर न जाता अलिकडेच आनंदवन चौकात उतरावे. आनंदवन चौकातून आनंदवनातील कार्यालयाकडे यावे. हे अंतर चालत जाण्याइतपत आहे.

रेल्वेने वरोरा येथे पोहचण्यासाठी नागपूर वा वर्धा येथून पॅसेंजर गाडी मिळू शकते. मात्र फारच थोड्या एक्सप्रेस गाड्यांना वरोरा येथे थांबा दिलेला असल्याने त्याबाबत नीट चौकशी करुन घ्यावी.

जे ज्येष्ठ मित्र सेवांकुरमध्ये प्रथमच येत आहेत त्यापैकी काहींचा संक्षिप्त परिचय खाली दिला आहे. त्याशिवाय इतर अनेक ज्येष्ठ मित्र केवळ आपल्याला भेटण्यासाठी व आपल्या सोबत राहण्यासाठी म्हणून येत आहेत. ...

१. **डॉ. जगदीश पाटील, मुंबई** : मूळ परभणी जिल्ह्यातील कृषिमध्ये डाक्टरेट मिळवून, एमपीएससी द्वारा उपजिल्हाधिकारी व समकक्ष पदावर राज्यात अनेक ठिकाणी कार्य. नंतर आयएएस दर्जा मिळवून सध्या महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून कार्यरत. पारधी पुनर्वसन, मोवाड (जि.नागपूर)च्या महापूर व किल्लारीच्या भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनामध्ये उल्लेखनीय कामगिरी. अभ्यासू, शांत व कल्पक अधिकारी.

२. **श्री. अधिक कदम** : जात–धर्म–पंथ–राज्य या सर्व सीमा मिटवू पाहणारा अहमदनगर जिल्ह्यातील हा अत्यंत धाडसी तरूण. **बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशन** ही संस्था स्थापन करून, काश्मिरमध्ये अनाथ मुस्लिम मुलींच्या शिक्षण व पुनर्वसनाचे, प्रसंगी जीवावर बेतणारे अत्यंत कठीण काम करतोय. तेथे ३ ठिकाणी वसतीगृहे. आतापर्यंत १७ वेळा अतिरेक्यांच्या तावडीतून सहीसलामत सुटका.

३. **सुश्री. किरण कुळकर्णी,** एसडीओ, गडचिरोली : कोल्हाटी समाजातील पहिल्या महिला अधिकारी, संघर्षमय जीवन. एमपीएससी होण्यापूर्वी, ज्ञान प्रबोधिनी–पुणे संस्थेच्या पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून ३ वर्ष काम केले. २००३ साली उपजिल्हाधिकारी म्हणून वर्धेला रुजू. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे उल्लेखनीय काम. नंतर गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यात बदली. तेथे ग्रामपंचायत, विधानसभा व लोकसभा या तीनही निवडणुकी पार पाडण्याची अवघड जबाबदारी यशस्वी केली.

४. **श्री. मनोहर साळुंखे, सातारा** : प्रगतीशील, नाविण्यपूर्ण कल्पना राबविणारा लखपती शेतकरी. २०१२ चा कृषिभूषण पुरस्कार. कोरडवाहू आवळा व सोयाबिन, एक एकराचे ग्रीन हाऊस, जगभरातील बाजारपेठांवर लक्ष ठेवून त्यानुसार पिकांचे नियोजन करणारा अभ्यासू शेतकरी. इतर शेतकऱ्यांच्या प्रबोधनासाठी सतत पुढाकार व कार्यरत.

५. **श्री. विजय जाधव, मुंबई :** समतोल फाऊंडेशन या संस्थेद्वारा गेल्या ८ वर्षांपासून घरुन पळून आलेल्या मुलांच्या शिक्षण व पुनर्वसनासाठी कार्यरत. आतापर्यंत अशा ४५०० मुलांना त्याच्या घरी परत पाठविण्यामध्या यशस्वी. मुंबईमध्ये शेल्टर होम, मनपरिवर्तन शिबिरे, समुपदेशन, पोलीसांसाठी कार्यशाळा इ. अनेक उपक्रम.

६. **श्री. देवाजी तोफा, गडचिरोली** : मेंढा या लहानशा खेड्यामधील केवळ ५ वा वर्ग शिक्षण असलेले, पण आपल्या कार्य–कर्तृत्वाच्या जोरावर राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचलेले आगळे–वेगळे व्यक्तीमत्व. सातत्यपूर्ण सामूहिक अभ्यास व कृति यांच्या आधार, जंगलावर अधिकार मिळविणारे भारतातील पहिले गाव. ग्रामविकसनासाठी अनेक सामूहिक लढे. अनेक गावांना दिशा देण्याचे काम.

७. **डॉ. संग्राम व डॉ. नुपूर पाटील, एरंडोल, जळगाव** : परदेशातील सर्व उपलब्ध संधी सोडून स्वदेस परतलेले उच्चशिक्षित डॉक्टर जोडपे. स्वत:च्या गावात आरोग्यसुविधेसाठी चालविलेला दवाखाना, शाळा व अन्य उपक्रम. इतरही अनेक प्रश्नांना हात घालून योजलेल्या अनेक कल्पक व धाडसी योजना.

८. **यजुर्वेंद्र महाजन, जळगाव** : दिपस्तंभ फाऊंडेशन मार्फत स्पर्धा परिक्षेची मनोवृत्ती खानदेशातील सर्वसामान्य ग्रामीण तरूणांमध्ये रुजविणारे, शिक्षणक्षेत्रात अनेक भव्य, धाडसी व कल्पक योजना आखून यशस्वीरित्या पूर्ण करणारे, अनेक चांगल्या व्यक्तीमत्वांशी जवळचं नातं जोपासणारे तरूण प्रेरक व्यक्तीमत्व. उत्कृष्ट वक्ता व योजक.

## कार्यक्रम पत्रिका

(सेवांकुरचा एकूण कार्यक्रम साधारणत: खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार असेल. एकूण होणाऱ्या सत्रांपैकी साधन व्यक्तींच्या जीवन व कार्याचा परिचय मुलाखतीच्या माध्यमातून आपण करून घेणार आहोत. वेळापत्रकात गरजेनुसार बदल केले जावू शकतात. तरी वेळापत्रका पलिकडे स्वत:ला ताणण्याच्या व सेवांकुर पूर्णपणे वसूल करण्याच्या मानसिक तयारीने या.)

| | | | |
|---|---|---|---|
| दि. २२ फेब्रु., | सकाळी ९ ते ११–आगमन व नोंदणी | ११ ते १ – परिचय, प्रास्ताविक | १ ते २ – भोजन |
| शुक्रवार | २ ते ३ गटचर्चा | ३ ते ५ –सत्र १ | ५ ते ६– मुक्त वेळ |
| | ६ ते ८ – सत्र २ | ८ ते ९ –भोजन | ९ ते ११ – सत्र ३ |
| दि. २३ फेब्रु., | सकाळी ६ ते ७ – खेळ | ७ ते ८ – स्नान व तयारी | ८ ते ९ – चहा, नाश्ता |
| शनिवार | ९ ते १ – सत्र ४ व ५ | १ ते २ – भोजन | २ ते ३ – गटचर्चा |
| | ३ ते ५ आनंदवन दर्शन | ५ ते ६ – मुक्त वेळ | ६ ते ८ – सत्र ६ |
| | ८ ते ९ – भोजन | ९ ते ११ – सत्र ७ सेवांकुरचे तारे | |
| २४ फेब्रु., | सकाळी ६ ते ७ –खेळ, | ७ ते ८ – स्नान व तयारी, | ८ ते ९ – चहा, नाश्ता |
| रविवार | ९ ते १ – सत्र ८ व ९ | १ ते २ – भोजन | २ ते ४ – प्रतिक्रिया व समारोप |

=============